| PUBLICATION | Navrashtra(Pune Plus) |
|---|---|
| DATE | October 09th , 2018 |
| PAGE NO | 02 |
| Edition | Pune |

# ‘साय-फाय’ करंडक एकांकिका स्पर्धा

## सायबर सुरक्षेबद्दल जागरूकता पसरवणे हा उद्देश

पुणे : क्विक हील टेक्नॉलॉजीज लिमिटेड या आयटी सुरक्षा सोल्युशन कंपनीची एक सीएसआर शाखा क्विक हील फाऊंडेशन, थिएटर अकॅडमी आणि महाराष्ट्र सायबर पोलिस यांनी २०१८ मधील साय-फाय करंडकसाठी महाराष्ट्र राज्यातून प्रवेशिका मागवल्या आहेत. साय-फाय करंडक ही एक एकांकिका स्पर्धा आहे, जिचा उद्देश तत्कालीन थिएटरच्या माध्यमातून सायबर सुरक्षेबाबत जागरूकता पसरवणे हा आहे. साय-फाय करंडक २०१७ मध्ये महाराष्ट्रातील १०० पेक्षा जास्त टीम सहभागी झाल्या होत्या, या यशाच्या पायावरच यंदाची स्पर्धा योजली आहे.

क्विक हील फाऊंडेशन आणि थिएटर अकॅडेमी यंदाच्या साय-फाय करंडकाचे आयोजन महाराष्ट्र सायबर पोलिसच्या सहयोगाने करत आहेत. थिएटर अकॅडेमी, आणि नाट्यकर्मी सुप्रसिद्ध प्रसाद पुरंदरे यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील कान्या-कोपऱ्यातून आलेल्या प्रादेशिक केंद्रांच्या टीम्सची निवड करेल.

या टीम अशा समकालीन विचारप्रवण एकांकिका सादर करतील, ज्यांमध्ये डिजिटल दुनियेत आजच्या जीवनाचे प्रतिबिंब दिसत असेल. साय-फाय करंडकाच्या माध्यमातून याबद्दल बोलताना क्विक हीलचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कैलाश काटकर म्हणाले, क्विक हील फाऊंडेशन या आमच्या सीएसआर शाखेला सुकर करण्यासाठी साय-फाय करंडकची सुरुवात झाली होती.